दिनांक ०२/०५/२०२२

# प्रसिध्दी पत्रक

**आलोसे श्री. ज्ञानेश्वर मोहनराव नजन, वय 43 वर्षे, पद-तलाठी, सजा-शिवराई, ता. वैजापुर, जिल्हा औरंगाबाद रा. लक्ष्मीनारायणनगर, लाडगाव रोड वैजापुर ता. वैजापुर जिल्हा औरंगाबाद. यांनी तक्रारदार यांच्याकडुन रुपये 2000/लाचेची रक्कम स्विकृती केल्याने, ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे वैजापुर,औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| आलोसे यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री. ज्ञानेश्वर मोहनराव नजन, वय 43 वर्षे, पद-तलाठी, सजा-शिवराई, ता. वैजापुर, जिल्हा औरंगाबाद रा. लक्ष्मीनारायणनगर, लाडगाव रोड वैजापुर ता. वैजापुर जिल्हा औरंगाबाद |
| लाच मागणी रक्कम | :- | 2000/- रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 2000/-रुपये |
| तपास अधिकारी | :- | श्री. हनुमंत वारे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे मुरमाचे ट्रॅक्टर विनारॉयल्टी चालु देण्यासाठी.. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचे सजा शिवराई हद्दीत विना रॉयल्टी मुरमाचे ट्रॅक्टर चालु देण्यासाठी श्री.नजन यांनी तक्रारदार यांना रुपये 2000/- लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी दि. 2/5/2022 रोजी तक्रार दिली.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, **श्री नजन** यांनी तक्रारदार यांच्याकडे 2000/- रुपयाची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज रोजी सापळा आयोजीत केला असता, आलोसे श्री. ज्ञानेश्वर मोहनराव नजन, तलाठी,सजा शिवाराई यांनी पंच साक्षीदारासमक्ष तडजोडी अंती लाचेची रक्कम रुपये 2000/-लाडगावरोड वैजापुर येथे स्विकारल्यानंतर आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध वैजापुर औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा.डॉ.राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक श्री. मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, श्री. हनुमंत वारे यांनी कारवाई केली आहे. त्यांना सदरच्या कारवाई कामी पोना- साईनाथ तोडकर, भिमराव जिवडे, रविंद्र काळे, चालक चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net
संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 8888807299
अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

पोलीस उप अधिक्षक कार्यालय अँटी करप्शन ब्युरो औरंगाबाद
सत्यमेव जयते

**(मारुती पंडीत)**
**पोलीस उप अधीक्षक,**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद.**